**अट्टल वाहनचोरांना दरोडा विरोधी पथकाकडुन अटक चोरीच्या ३,१०,०००/- रुपयांच्या ०७ चोरीच्या दुचाकी जप्त**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील मोबाईल स्नॅचिंग, चेन स्नॅचिंग, वाहन चोरी, घरफोडीचे गुन्हयास प्रतिबंध व्हावा व गुन्हे उघडकीस आणणेकरीता वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांनुसार दरोडा विरोधी पथकाचे सपोनि देशमुख, पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे,पोउनि गोसावी व दरोडा विरोधी विरोधी पथकाचे अंमलदार असे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तलयातील उघडकीस न आलेले गुन्हयाबाबत माहिती घेत असताना, पोना कोकणे व पोना कदम यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फेत बातमी मिळाली की, संत तुकाराम नगर,पिंपरी परिसरात एक इसम दुचाकी चोरी करण्यासाठी येणार असुन त्याचे जवळ असलेली मोटार सायकल ही चोरीची आहे. तसेच त्याने पिंपरी चिंचवड परिसरात अनेक वाहन चोरीचे गुन्हे केलेले आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने, पोउपनिरी भांगे यांनी लागलीच सदर बातमीचा आशय वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रामदास इंगवले यांना कळविला असता, वपोनि रामदास इंगवले यांनी दिलेल्या सुचनांवरुन दरोडा विरोधी पथकातील अधिकारी व स्टाफ यांनी सापळा रचुन अतिशय शिताफाने सदर इसमास पकडुन त्याचे नाव विचारता त्याने त्याचे नाव पत्ता **१) प्रतिक ऊर्फ हायजॅक योगिराज खडसे,वय – २४ वर्षे,रा.लक्ष्मीनगर, येरवडा मुळ रा.मंगळुरपिर जि.वाशिम.** असे असल्याचे सांगितले.

नमुद आरोपी कडून तपसादरम्यान चोरीच्या दुचाकी जप्त करुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणणेत आलेले आहेत.

**१) पिंपरी पोलीस स्टेशन गु.र.नं. २९७/२०२३ भा.द.वि.क.३७९**

**२) आळंदी पोलीस स्टेशन गु.र.नं. ३२४/२०२० भा.द.वि.क.३७९**

**३) लोणावळा पोलीस स्टेशन गु.र.नं. ६६/२०२० भा.द.वि.क.३७९**

**४) चाकण पोलीस स्टेशन गु.र.नं.  /२०२० भा.द.वि.क.३७९**

**५) चाकण पोलीस स्टेशन गु.र.नं.  /२०२० भा.द.वि.क.३७९**

तसेच चिंचवड भागात पोउनि भांगे व स्टाफ असे पेट्रोलिंग करीत असताना पोना बनकर व पोना कांबळे यांना मिळालेल्या बातमीवरुन आरोपी नामे १) रमन मोहन ठाकुर ,वय

– २२ वर्षे,रा.लक्ष्मीनगर,चिंचवड गाव,पुणे २) शुभम गंगाराम पिटेकर वय – २४ वर्षे,रा.मंचर ता.खेड,जि.पुणे यांना अटक करुन त्यांचे कडुन चोरीच्या ०२ दुचाकी हस्तगत करुन त्यांचे कडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहेत.

**६) हिंजवडी पोलीस स्टेशन गु.र.नं. २५५/२०२० भा.द.वि.क.३७९**

**७) मंचर पोलीस स्टेशन गु.र.नं. ३८/२०२२ भा.द.वि.क.३७९**

**सदरची कामगिरी हि मा. पोलीस उप आयुक्त सो।,गुन्हे श्रीमती सपना गोरे, मा.सहायक पोलीस आयुक्त श्री.पद्माकर घनवट, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.रामदास इंगवले यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि देशमुख,पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे,भरत गोसावी,सपोफौ महेश खांडे,पोहवा नितीन लोखंडे,विक्रांत गायकवाड,उमेश पुलगम,राहुल खारगे,आशिष बनकर,प्रविण कांबळे,सागर शेडगे,गणेश कोकणे,अमर कदम,समीर रासकर,प्रविण माने यांचे पथकाने केली आहे.**

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**दरोडा विरोधी पथक,गुन्हे शाखा**
**पिंपरी चिंचवड**